## सरकार तर्फे साक्षीदार क्रं.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव - प्रविण यशवंतराव जाधव,
वय ४२ वर्षे, व्यवसाय – पोलीस हवालदार ब.न.९२४,
राहणाार – पोलीस स्टेशन, भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री व्ही.डब्ल्यु.वानखडे यांचे मार्फत**

१. मी आरोपीला ओळखत नाही. मी जखमीला ओळखतो. दिनांक १३.०१.२०२२ मी पोलीस स्टेशन, भिवापूर, येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी मी डे अधिकारी म्हणून कर्तव्यावर असतांना मला फोन आला की नक्षी येथे अपघात झाला आहे. त्यानंतर मी घटनास्थळी गेलो. तेथे मी दोन पंचांना समन्स दिला. आता मला दाखविलेला पंचनामा समन्स तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र.३ देण्यात येते. त्यानंतर पचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र.४ देण्यात येते. त्यानंतर मी ग्रामीण रुग्णालय भिवापूर येथे गेलो व तहरील करीता वैद्यकिय अधिका-यांना पत्र दिले. आता मला दाखविलेला पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र.५ देण्यात येते. त्यानंतर मी साक्षीदारांचे बयाण नोंदविले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला येवून फिर्याद दिली. आता मला दाखविलेला फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र.६ देण्यात येते. आता मला दाखविलेला छापील खबर अहवाल तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र.७ देण्यात येते. पुढील तपास विनोद झाडे यांनी केला.

**सरतपास संपला.**

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री. नागोशे यांचे मार्फत** -

२. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांना नोटीस दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी पंचनाम्यामध्ये खोटे घटनास्थळ दाखविले. हे म्हणणे खरे नाही की मी साक्षीदारांच्या सांगण्याप्रमाणे बयाण नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत घटनास्थळाजवळ वळण रस्ता आहे व पुलिया आहे. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत घटनास्थळाचा रोड हा पुर्वी गीट्टीने भरलेला होता. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत घटनास्थळावर बरोच खड्डे पडले आहे. हे म्हणणे खरे आहे की नक्षीरोडवरुन बरीच वाहने जातात. हे म्हणणे खरे नाही की जखमी हा घटनेच्या वेळी दारु प्यालेला होता. हे म्हणणे खरे नाही की मी जखमी सोबत संगणमत करुन खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १३.०९.२०२४.

स्वा/-
( एस.जे. लाड )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.